# नियमित दिवाणी दावा क्र.४४/२०२१ मधील नि.क्र.५ व (५–अ) वरील आदेश

## (पारित दिनांक ०४ डिसेंबर, २०२४)

प्रस्तुतचा अर्ज निशाणी ५ वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये दाखल करण्यात आला आहे. सदर निशाणी ५ मधील अर्जातील दुरुस्तीमुळे त्यास निशाणी ५–अ देण्यात आला. वादीचे म्हणणेनुसार मौजा – मलठण, ता.दौंड, जि. पुणे येथील गट क्र.१० मधील ० हे. ६९ आर यापैकी मे. व्यंकटेश्वरा हॅचरीज यांना विक्री केलेले ५ आर क्षेत्र सोडुन, गट क्र.२४८/२ मधील क्षेत्र ० हे. ८० आर, गट क्र.१८७ मधील क्षेत्र १ हे. २९ आर, गट क्र.१९२ मधील क्षेत्र ० हे. ७६ आर या मिळकती (यापुढे ''वाद मिळकत'') असे संबोधण्यात येते. वादीचे म्हणणेनुसार वादी व प्रतिवादी यांचे मुळ पुरुष श्रीपती तात्याबा वाघमाडे हे होते व ते दि.१०/०९/१९६३ रोजी मयत झाले. श्रीपती व त्यांची पत्नी हाऊसाबाई यांना निवृत्ती व साहेबराव ही मुले होती. सदर निवृत्ती वाघमोडे हा निपुत्रीक मरण पावला. सदर साहेबराव श्रीपती वाघमोडे यांना सदर प्रकरणातील मयत वादी ज्ञानदेव तसेच प्रतिवादी क्र.१ ते ५ हे अपत्ये आहेत.

२. वादीचे म्हणणेनुसार गट क्र.१० मधील क्षेत्र ० हे. ६९ आर ही मिळकत वादी व प्रतिवादी यांची एकत्र कुटूंबाची मिळकत आहे. तसेच गट क्र.२४८/२ मधील क्षेत्र ० हे. ८० आर ही मिळकत शासनाकडुन उजनी धरणास एकत्र कुटूंबाची गट क्र.१० मधील क्षेत्र १ हे. ४० आर जमिन संपादित झाल्यामुळे मिळालेली आहे. वादीचे म्हणणेनुसार दावा मिळकतीचे वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान सरस–निरस मनाने वाटप झालेले नाही.

३. वादीचे म्हणणेनुसार ज्ञानदेव हे इरीगेशन विभागात शिपाई पदावर सन १९६६ ते २००६ पर्यंत कार्यरत होते. त्या दरम्यान मयत ज्ञानदेव हे इंदापुर, टाकळी, श्रीगोंदा याठिकाणी नोकरीवर होते. त्यामुळे एकत्र कुटूंबाची मिळकत गट क्र.१८७ क्षेत्र १. हे २९ आर. हे प्रतिवादी

क्र.१ व गट क्र.१९२ मधील क्षेत्र ० हे ७६ आर ही मिळकत प्रतिवादी क्र.२ यांनी मयत वादी ज्ञानदेव हे नोकरीस असल्याचा गैरफायदा घेवुन बेकायदेशिरपणे संमतीविना स्वतःचे नावावर करुन घेतली. वादीचे म्हणणेनुसार वादी व प्रतिवादी हे दावा मिळकतीच्या एकत्र वहिवाटीतुन उत्पन्न घेत आहेत. वादीचे म्हणणेनुसार प्रतिवादी क्र.१ व २ यांनी मुद्दामहुन वादी यांचा दावा मिळकत गट क्र.१८७ व १९२ मधील कायदेशिर अविभक्त हिस्सा गिळंकृत करण्याच्या दृष्टीने मयत ज्ञानदेव यांना अंधारात ठेवुन त्यांच्या अपरोक्ष तहसिलदार, दौंड यांचेकडील हुकूम नं.हनो/वाटप/एस.आर./३९२/९० दि.१०/०१/१९९१ रोजी बेकायदेशिरपणे एकतर्फा आदेश मिळवला व स्वतःचे नावे फेरफार क्र.१४३० अन्व्ये वाटप दाखविले. सदर प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या नोंदी या पोकळीस्थ व बोगस असल्याने त्या वादीच्या हिश्यावर बंधनकारक नाहीत. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी गट क्र.१८७ व १९२ वरील त्याचे नावाचा गैरफायदा घेवुन दावा मिळकतीचे वहिवाट करण्यास अडथळा केला आहे. प्रतिवादी हे दावा मिळकत विक्री करण्याची भाषा करीत आहेत.

४. वादींनी सदर दावा मिळकतीचे वाटप करुन मागितले असता प्रतिवादींनी त्यास नकार दिला. त्यामुळे दावा मिळकतीचे वाटप होण्यापुर्वी प्रतिवादींनी हस्तांतर केल्यास अगर दावा मिळकतीची विक्री केल्यास, बोजा चढविल्यास, दाव्यामध्ये गुंतागूंत वाढणार आहे. वादीचे म्हणणेनुसार दावा हा गुणदोषावर चालवुन निकाल लागण्यास बराच कालावधी लागणार आहे. दरम्यानचे काळात प्रतिवादी यांनी स्वतः अगर त्यांचे मुखत्यार, एजंट, अगर अन्य कोणामार्फत दावा मिळकतीचे वाटत होइपावेतो विक्री विल्हेवाट तबदील केल्यास वादीचे पैशाचे स्वरुपात कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. प्रथमदर्शनी दावा वादीचे बाजुने आहे. दाव्याचा तुळदेखील वादीचे बाजुने असुन जर मनाईहुकूम न दिल्यास वादीचे आतोनात नुकसान होणार आहे. याउलट प्रतिवादींचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही. करीता, वादीने सदरचा अर्ज मंजुर करुन प्रतिवादी यांनी वादीचे हिश्याचे सरस–निरस मानाने वाटप होईपर्यंत कोणत्याही प्रकारे स्वतः, मुखत्यारामार्फत, नोकर, चाकर, एजंटमार्फत इतर कोणाही मार्फत दावा मिळकतीची

विक्री, विल्हेवाट, तबदीली करु नये, अगर सदर दावा मिळकतींवर कोणाचेही हक्क निर्माण करु नये अगर सोसायटी, बँक, पतसंस्था यांचा कर्ज बोजा निर्माण करु नये असा तुर्तातुर्त ताकीदीचा हुकूम प्रतिवादी यांना करण्याची विनंती केली.

५. सदर अर्जावर प्रतिवादींनी निशाणी ३१ व ५५ वर म्हणणे दाखल केले. प्रतिवादींचे म्हणणेनुसार वादीचे दाव्यातील वंशावळ वगळता इतर सर्व मजकुर हा प्रतिवादींना मान्य नसल्याचे नमुद केले. प्रतिवादींचे म्हणणेनुसार दावा व अर्ज दाखल करण्यास वादीला कोणतेही कारण घडले नाही. दावा मिळकतीच्या चतुःसिमा ख–या व पुर्ण नाहीत. तसेच सदरच्या दाव्यास मुदत कायद्याची बाधा आहे. प्रतिवादींचे म्हणणेनुसार दावा मिळकतीचे सरस–निरस मानाने वाटप यापुर्वीच झालेले आहे. तसेच दावा मिळकतीची वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये कधीही सामाईक वहिवाट नव्हती. दावा मिळकतीत वादींचा कोणताही हिस्सा नाही. सदर दाव्यास (Non joinder of necessary parties) या तत्वाची बाधा येते. तसेच दाव्यामध्ये वादीने गट क्र.१०५/७ मधील एकत्र कुटूंबातील उत्पन्नातुन खरेदी केलेलया जमिनीचा उल्लेख केला नाही. त्यामुळे सदर वाटपाच्या दाव्यात संपुर्ण मिळकत समाविष्ट केली नसल्याने वादीचा दावा चालण्यास पात्र नसल्याचे नमुद केले.

६. प्रतिवादींचे म्हणणेनुसार दावा मिळकत गट क्र.२४८/२ ही भोगवटा वर्ग–२ ची जमिन आहे. ती पुनर्वसनाचे तरतुदीनुसार सरकारकडुन वाटप झाली आहे. त्याचे वाटप प्रतिवादी क्र.१ यांना पश्चिमेकडील १ एकर व पुर्वेकडील उरलेले १ एकर वादी यांना मिळाले आहे.

७. प्रतिवादींचे म्हणणेनुसार वादीने त्यांचे क्षेत्र पडीक ठेवले. त्यानंतर दि.०८/१२/२००५ रोजी मयत वादी ज्ञानदेव व प्रतिवादी क्र.१ व २ यांचेमध्ये प्रतिज्ञालेख झाला व त्यामध्ये दि.२५/०९/१९९६ रोजीचे मयत साहेबराव वाघमोडे यांचे मृत्युनंतर मलठण येथील गट क्र.१९२ क्षेत्र ० हे. ७६ आर जमिन प्रतिवादी क्र.२ यांना वाटप करुन देण्यात आली.

तसेच गट क्र.२४८ व गट क्र.१० मध्ये गट क्र.२४८ चे मोबदल्यात गट क्र.१९२ चे क्षेत्र ० हे. ७६ आर. मिळाले असल्याचे प्रतिवादी क्र.२ यांनी मान्य केले व गट क्र.२४८ मध्ये हिस्सा नको असे नमुद केले.

८. प्रतिवादींचे म्हणणेनुसार गट क्र.१८७ मधील जमिन निवृत्ती वाघमोडे यांनी त्यांचे हयातीत त्यांना अपत्ये नसल्याने प्रतिवादी क्र.१ नामे विठ्ठल वाघमोडे यांना सन १९९१ मध्ये मालकी हक्काने दिली. तसेच तहसिलदार यांचेकडील १४३० फेरफार ह.नो./वाटप/एस.आर/३९२/१९९० चे आदेशाने वाटप करण्यात आले. तेव्हापासुन प्रतिवादी क्र.१ व २ हे मालकी हक्काने वहिवाट करीत आहेत. गट क्र.१० ही वहितीपड असुन त्याचे वाटप सन १९९१ साली वादीस ० हे. २१ आर व प्रतिवादी क्र.१ व २ यांना प्रत्येकी २१ आर असे वाटपात देण्यात आले. काही दावा मिळकतीच्या गटावर सामाईक असा शेरा असल्याने वादींनी सदरचा खोटा व बनावट दावा आणला.

९. प्रतिवादींचे म्हणणेनुसार दि.०८/१२/२००५ रोजी मयत वादी ज्ञानदेव व प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिज्ञापत्र लिहुन देवुन प्रतिवादी क्र.२ पोपट यांना गट क्र.१९२ मध्ये ० हे. ७६ आर. जमिनी वाटपात मिळाल्याचे कबुल केले व वडील हयात असताना गट क्र.१९२ क्षेत्र ० हे. ७६ आर हिश्याप्रमाणे मिळाल्याचे कबुल केले आहे. गट क्र.२४८/२ मध्ये प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी प्रतिवादी क्र.१ यांना हक्कसोडपत्र करुन दिले आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांच्यात वाटप झालेले आहे. बाकी प्रतिवादी क्र.३ ते ५ यांनी गट क्र.१० वगळुन त्यांचे हिस्से स्वेच्छेने कायमचे सोडले आहेत. त्यामुळे प्रथमदर्शनी केस वादीचे पक्षात नाही. सोईचा समतोल प्रतिवादींचे बाजुने आहे. मनाईहुकूम दिल्यास प्रतिवादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. करीता, प्रतिवादींनी सदरचा वादीचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

१०. अर्ज, दावा, जबाब दावा, म्हणणे वाचले. वादीचे व प्रतिवादीचे वकीलांचे म्हणणे ऐकले. कागदपत्रांचे अवलोकन केले असता माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित होतात.

| अनुक्रमांक | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | काय वादी हे त्यांचे केस सकृतदर्शनी सिध्द करतात ? | **...होकारार्थी** |
| २. | न्यायाचा तौलनिक तराजु (तुळ) वादीच्या बाजुने आहे काय ? | **...होकारार्थी** |
| ३. | वादी यांच्या हक्कात तात्पुरत्या मनाई हुकूमाचा आदेश न झाल्यास त्यांचे कधीही न भरुन येणार नुकसान होते काय ? | **...होकारार्थी** |
| ४. | काय आदेश ? | **अर्ज मंजुर करण्यात येतो.** |

## ःः कारणमिमांसा ःः

**मुद्दा क्र.१ ते ३ करीता –**

११. सदरचे मुद्दे हे आपसात निगडीत असल्याने त्यावरील कारणमिमांसा एकत्रित देण्यात येत आहे.

१२. तात्पुरत्या मनाई हुकुमासाठीच्या अर्जावरील आदेश करण्यापुर्वी प्रथम तात्पुरत्या मनाईच्या संदर्भातील स्थापित न्यायतत्वांचा उहापोह करणे गरजेचे आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ यांचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, सदर आदेशान्वये केवळ अर्जदाराला अंतिम न्यायनिर्णयापर्यंतचा आदेश प्राप्त होतो. तात्पुरत्या मनाई हुकूमाच्या अर्जाचा मुळ उद्देश हा दोन्ही पक्षकारातील मालमत्तेसंबंधीचे हक्क व अधिकार हे तात्पुरत्या काळापुरते निश्चित करणे, वाद मालमत्तेची परिस्थीती व तिचे संरक्षण अंतिम न्यायनिर्णयापर्यंत करणे होय.

१३. तात्पुरत्या मनाई अर्जाचा आदेश करण्यापुर्वी वादी यांना त्याची केस सकृतदर्शनी सिध्द करणे गरजेचे आहे. तसेच वादीने वाद संपत्तीमध्ये त्यांचा अधिकार असल्याची बाब स्पष्टपणे

सिध्द करणे गरजेचे आहे. सकृतदर्शनी केस म्हणजे न्यायालयाला तात्पुरत्या मनाईच्या अर्जावर आदेश करताना कुठल्याही मुद्यासंदर्भात संभ्रम निर्माण न होता व कुठलाही वाद मुद्दा यास पुराव्याची आवश्यकता नसणे हे होय. म्हणजेच तात्पुरत्या मनाईच्या अर्जाच्यावेळी न्यायालयाने वाद मुद्यांच्या संदर्भात पुरावा घेणे अपेक्षित नाही. तसेच वाद मुद्यासंदर्भात सखोल निष्कर्ष नोंदवणेदेखील गरजेचे नाही. न्यायालयाला केवळ सकृतदर्शनी वादी हा त्याची केस स्वच्छ हाताने घेउन आला आहे किंवा नाही हे पाहणे गरजेचे आहे. तात्पुरता मनाईचा आदेश जर वादीचे हक्कात दिला तर तुलनेने प्रतिवादीचे नुकसान अथवा त्यांना जास्त अडचण/त्रास होईल का हे पाहणे गरजेचे आहे. तसेच वादीने त्याला तात्पुरत्या मनाईच्या आदेशाची जास्त गरज असल्याचे व त्याचे खुप नुकसान होणार असल्याची बाब स्पष्टपणे न्यायालयासमोर आणणे गरजेचे आहे. उपरोक्त न्यायतत्वाच्या अनुषंगाने प्रकरणातील तथ्यांचे अवलोकन करणे गरजेचे आहे.

१४. अर्ज, दावा, जबाबदावा व कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीचे वकीलांनी त्यांच्या अर्जातील म्हणण्याप्रमाणे युक्तीवाद केला. तसेच प्रतिवादीच्या वकीलांनी त्यांचे म्हणणे व जबाबदाव्याच्या अनुशंगाने युक्तीवाद केला. वादीच्या वकीलांचे म्हणणेनुसार तहसिलदार यांचे समोरील वाटपावेळी ज्ञानदेव वाघमोडे पक्षकार नव्हते. त्यामुळे त्यांनी तहसिलदाराच्या आदेशाविरुध्द अपील केले नाही. जर दावा मिळकतीचे वाटप झाले असेल तर ७/१२ वरती वारसांची नावे कमी का झाली नाहीत, याचा बोध होत नसल्याचे नमुद केले. प्रतिवादींचे वकीलांचे म्हणणेनुसार १९९१ मध्ये तहसिलदार यांच्यासमक्ष दावा मिळकतीचे वाटप झाले आहे. त्याचा फेरफार क्र.१४३० हा वादीने आव्हानित केला नाही. दाव्यात सर्व पक्षकार सामिल नाहीत. दाव्यात संपुर्ण मिळकत सामिल केली नाही. तसेच प्रतिवादी हे मुळ मालक असल्याने त्यांचेविरुध्द मनाईहुकूम देता येणार नाही. करीता, प्रतिवादींनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

१५. प्रकरणात दाखल दावा मिळकतीच्या गट क्र.१०, गट क्र.२४८/२ चे ७/१२

उता–याचे अवलोकन केले असता सदर दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांचे सामाईक मालकीचे असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. तसेच फेरफार क्र.३०३० चे अवलोकन केले असता गट क्र.१० व २४८/२ या दावा मिळकतीवर मयत साहेबराव श्रीपती वाघमोडे यांचे दि.२५/०९/१९९६ रोजी मरण पावल्यानंतर झालेल्या फेरफाराचे अवलोकनावरुन सर्व वादी व प्रतिवादी यांचे नाव असल्याचे दिसुन येते. प्रतिवादींचे म्हणणेनुसार दावा मिळकतीचे वाटप हे तहसिलदार यांचेसमक्ष दि.१०/०१/१९९१ रोजी झाले आहे. परंतु, वादीने दाखल केलेल्या कागदपत्र यादी निशाणी ३ अनुक्रमांक २४ वर सदर ह.नो./वाटप/एस.आ./३९२/९० हे प्रकरण मिळत नसल्याबाबतचा लेखी रीपोर्ट दिसुन येतो. वादीचे म्हणणेनुसार तहसिलदार, दौंड यांचेसमक्ष झालेल्या वाटपावेळी ज्ञानदेव वाघमोडे पक्षकार नव्हते. तसेच सदर वाटप हे त्यांच्यावर बंधनकारक नाही. प्रकरणात प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दाखल केलेला गट क्र.२४८/२ च्या अनुशंगाने झालेला मयत ज्ञानदेव व प्रतिवादी क्र.१ व २ यांचेमधील प्रतिज्ञालेख अद्याप सिध्द झालेला नाही. सदरचा दावा हा वाटपाचा आहे व प्रस्तुत वादी हे दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत प्रतिवादींनी दावा मिळकत हस्तांतरीत करु नये, अशी मागणी करीत आहेत.

१६. प्रकरणात दावा मिळकतीच्या अनुशंगाने झालेल्या पुर्वीच्या तहसिलदार यांचेकडील वाटप व प्रतिवादींनी दाखल केलेला हक्कसोडलेख व मयत ज्ञानदेव व प्रतिवादी क्र.१ व २ यांचेमधील प्रतिज्ञालेखाचा विचार करता दावा मिळकती या हस्तांतरीत होण्याची वादींनी व्यक्त केलेली भिती रास्त आहे व तशी शक्यता आहे. प्रतिवादीचे विधीज्ञांचे म्हणणेनुसार मुळ मालकाविरुध्द मनाईचा हुकूम देता येणार नाही. परंतु, सदर प्रकरणात अद्याप वादी व प्रतिवादी यांची मालकी सामाईक आहे, असे कागदपत्रांवरुन दिसुन येते. तसेच प्रकरणात वाटप झाले आहे किंवा नाही? हा वादमुद्दा आहे. त्यामुळे आजरोजी प्रतिवादी हे एकटेच दावा मिळकतीचे मालक आहेत, असे म्हणता येणार नाही. याउपर वादी हे दावा मिळकतीच्या हस्तांतरणास प्रतिवादींना मनाई करण्याबाबत विनंती करीत आहेत. माझ्या मते वादीचा अर्ज नामंजुर केल्यास प्रकरणात दावा मिळकतीचे हस्तांतरण होऊन गुंतागूंत निर्माण होण्याची शक्यता आहे व वादीचे तुलनेने

जास्त नुकसान होणार आहे.

१७. कागदपत्रांच्या अवलोकनावरुन केस ही वादीचे पक्षात आहे. प्रतिवादींनी घेतलेला आवश्यक पक्षकार सामिल न केल्याबाबतचा, दावा मुदतीत नाही, दाव्यात संपुर्ण मालमत्ता सामिल नाही, हा आक्षेप पुराव्याअंती सिध्द होणार आहे. दाव्याच्या या टप्प्यात दावा मिळकत ही हस्तांतरीत होवु न देणे हा सदर अर्जामागचा हेतु आहे. करीता उपरोक्त चर्चेवरुन करीता, मी, मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर होकारार्थी देतो व मुद्दा क्र.४ च्या अनुषंगाने खालील आदेश पारीत करतो –

## आदेश

१. अर्ज निशाणी ५ मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादींना सदर आदेशाद्वारे आदेशित करण्यात येते की, त्यांनी दाव्याचा अंतिम लागेपर्यंत प्रतिवादी यांनी दावा मिळकतीतील वादीचे हिश्याचे सरस–निरस मानाने वाटप होईपर्यंत कोणत्याही प्रकारे स्वतः, मुखत्यारामार्फत, नोकर, चाकर, एजंटमार्फत इतर कोणाही मार्फत दावा मिळकतीची विक्री, विल्हेवाट, तबदीली करु नये, अगर सदर दावा मिळकतींवर कोणाचेही हक्क निर्माण करु नये अगर सोसायटी, बँक, पतसंस्था यांचा कर्ज बोजा निर्माण करु नये असा तुर्तातुर्त ताकीदीचा हुकूम देण्यात येतो.

३. अर्जाचा खर्च अंतिम निकालावेळी ठरविण्यात येईल.

SHAILENDRA NANDKISHOR PATIL

Digitally signed by SHAILENDRA NANDKISHOR PATIL
Date: 2024.12.05 14:47:33 +0530

ठिकाणः दौंड, **(एस.एन. पाटील)**

दिनांक ०४/१२/२०२४ ३ रे सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

दौंड, ता.दौंड, जि.पुणे

## प्रमाणपत्र

मी शपथेवर सांगते की या पी.डी.एफ न्यायनिर्णय फाईलमधील मजकुर हा मुळ न्यायनिर्णयातील मजकुराशी शब्द–न–शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | :: | एम.एम. चिंतले, |
| न्यायालयाचे नांव | :: | एस.एन. पाटील,<br>३रे सह दिवाणी न्यायाधीश, दौंड<br>ता.दौंड, जि.पुणे |
| निकाल दिनांक | :: | ०४/१२/२०२४ |
| पिठासीन अधिका–याने निकालपत्रावर सही केलेचा दिनांक | :: | ०४/१२/२०२४ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | :: | ०५/१२/२०२४ |